# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांकः- ३०/०१/२०१८

### येवला शहरात जबरी चोरी व घरफोडया करणारे सराईत गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

---

येवला शहरात गेल्या काही दिवसांपासुन घरफोडी, जबरी चोरी व चेन स्नॅचिंगचे प्रमाण वाढले होते, त्यामुळे सामान्य नागरीक, नोकरदार तसेच व्यापारी वर्गामध्ये घबराहटीचे वातावरण निर्माण झाले होते. वाढत्या घरफोडी, जबरी चो-या, चेन स्नॅचिंगचे गुन्हयांना आळा बसावा यासाठी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. हर्ष पोद्दार सो.** यांनी मालाविरुध्दचे नाउघड गुन्हयांचा सविस्तर आढावा घेवुन रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेतली व गुन्हे उघडकीस आणणेसाठी सतर्क रात्रगस्त व नाकाबंदी करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी येवला शहर व कार्यक्षेत्रातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत व चोरुन नेलेले मुद्देमाल कोठे विक्री केला जातो याबाबत गोपनीयरित्या माहिती घेवुन स्थागुशाचे पथकास गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक २९/०१/२०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी येवला शहरात गस्त घालत होते, दरम्यान स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना खब-यांमार्फत मिळालेल्या गुप्त बातमीनुसार स्थागुशाचे पथकाने येवला शहरात जबरी चो-या व घरफोडया करणारा सराईत गुन्हेगार नामे **१) रंगनाथ उर्फ संपत युवराज भोरकडे, वय २१, रा. पिंपळगाव जलाल, ता.येवला, जि.नाशिक** यास येवला-विंचुररोड परिसरात सापळा लावुन शिताफीने ताब्यात घेतले. सदर आरोपीस विश्वासात घेवुन तपासाचे कलाकौशलय वापरून चौकशी केली असता त्याने त्याचे साथीदार नामे **२) अजय उर्फ छोटया प्रभाकर वाघ, वय २०, रा. पिंपळगाव जलाल, ता.येवला,** जि.नाशिक याचेसह टिळक मैदान परिसरातुन एका महिलेची पोत जबरीने चोरी केल्याची कबुली दिली आहे, तसेच वल्लभनगर परिसरातही मोटर सायकलवर येवुन एका महिलेचे मणी मंगळसुत्र जबरीने लुटमार केल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपीने कबुली दिलेवरून **येवला शहर पोलीस ठाणेस दाखल असलेले I गुरनं ०३/२०१८ व I गुरनं १४/२०१८ भादवि कलम ३९२,३४ असे दोन जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस** आलेले आहे. आरोपी नामे अजय उर्फ छोटया प्रभाकर वाघ यास येवला शहरातुन ताब्यात घेतले असुन वरील दोन्ही आरोपीतांकडुन गुन्हयात वापरलेली एक काळे रंगाची बजाज पल्सर, व एक होण्डा लिव्हो अशा दोन मोटर सायकल, सॅमसंग व एम.आय कंपनीचे ०२ मोबाईल स्मार्ट फोन, रोख रूपये, चांदीचे ब्रेसलेट असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

तसेच सदर आरोपीतांना वरिल गुन्हयांचे समांतर तपासात चौकशी केली असता त्यांनी व त्यांचे येवला तालुक्यातील इतर साथीदारांनी येवला शहर परिसरात घरफोडया व चो-या केल्याची कबुली दिली वरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने सायंकाळचे सुमारास आरोपी नामे **३) सचिन उर्फ नल्ला संजय पवार,** वय १९, रा. गंगा दरवाजा, मुक्तांगण कॉलेज समोर, येवला, **४) शंकर ज्ञानेश्वर कुमावत, वय २५,** रा. बाजीरावनगर, पारेगाव रोड, येवला, **५) सागर गुलाब पवार, वय २३,** रा. पारेगाव, ता. येवला अशांना येवला शहरतील वेगवेगळया ठिकाणांहुन ताब्यात घेतले आहे. ताब्यात घेतलेले आरोपीतांनी येवला शहरातील आनंदनगर व कोटमगाव रोड परिसरात रात्रीचे सुमारास घरफोडया केल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपीतांनी कबुली दिलेवरून येवला शहर पोलीस ठाणेस दाखल असलेले **I गुरनं ०४/२०१८ व I गुरनं ११/२०१८ भादवि कलम ४५७,३८० असे दोन घरफोडीचे** गुन्हे उघडकीस आलेले आहे. सदर आरोपींचे कब्जातुन सॅमसंग, आयटेल, रेडमी एम.आय कंपनीचे ०३ मोबाईल फोन, दोन चांदिच्या अंगठया तसेच एक बजाज डिस्कव्हर मोटर सायकल हस्तगत करण्यात आलेली आहे.

आरोपी नामे सचिन पवार व शंकर कुमावत यांचे कब्जात मिळुन आलेली बजाज डिस्कव्हर मोटर सायकलचे मुळ मालकाची खात्री केली असता सदर मोटर सायकल ही **चांदवड पोलीस ठाणे । गुरनं १७/२०१८ भादवि कलम ३७९** या गुन्हयातील असुन सदर आरोपीतांनी वरील मोटर सायकल ही चांदवड शहरातील लासलगाव रोड परिसरातुन चोरी केल्याची कबुली दिली आहे. ताब्यात घेतलेले वरील पाचही आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन वरील गुन्हयांचे समांतर तपासात त्यांचेकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. यातील आरोपी नामे सचिन पवार, शंकर कुमावत व सागर पवार यांचे विरूध्द येवला शहर व येवला तालुका पोलीस ठाणेस घरफोडी, जबरी चोरी, मोटर सायकल चोरी असे एकुण १२ गुन्हे दाखल आहे. वरील गुन्हयांमधील जप्त मुद्देमाल व ताब्यात घेतलेले आरोपीतांना गुन्हयाचे पुढील तपासकामी येवला शहर पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे सा।** व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सा।** यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे,** पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल नाईक, पोना भरत कांदळकर, रावसाहेब कांबळे, पोशि प्रविण काकड, भाउसाहेब टिळे, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम अशा पथकाने वरील आरोपींना ताब्यात घेतले असुन घरफोडी ०२, जबरी चोरीचे ०२ व ०१ मोटर सायकल चोरी असे एकुण ०५ गुन्हे उघडकीस आणलेले आहे.